MHRT080006872021

**नियमित दिवाणी दावा क्र. ४१/२०२१**

**मधील निशाणी ७१ खालील आदेश**

वादीने सदरचा अर्ज हा आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे असे कथन आहे की, दावा हा वसुलीसाठीह दाखल आहे. याकामी प्रतिवादी क्र. ८ रघुनाथ यशवंत बाईत यांना पक्षकार केलेले आहे. मात्र बाईत यांच्या विरुध्द वादीला यापुढे दावा चालवायचा नाही. सबब प्रतिवादी क्र. ८ चे दाव्यातून नाव कमी करणेसाठी तसेच दाव्याच्या विनंती कलमामध्ये प्रतिवादी क्र. ८ विरुध्द दाद मागण्याकरीता जी विनंती केलेली आहे. त्यामध्ये कलम अ, ब, आणि ड यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते या शब्दापुढे ७ व १५ या अंकापूर्वी व ९ ते असे शब्द लिहिण्यास परवानगी मिळावी याकरीता हा दावा दुरुस्तीचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपेल लेखी म्हणणे दिले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कोणत्या तरतुदीखाली दाखल केला आहे हे अर्जात नमुद नाही. आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्ती करता येते. सदरचा अर्ज आदेश १ नियम १० अन्वये देणे अभिप्रेत होते. तसेच अर्ज विलंबाने दिलेला आहे. त्यामुळे सदरची दावा दुरुस्ती करता येणार नाही असे म्हणणे प्रतिवादीने दाखल केले.

३. याठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे की कोणत्याही दाव्यामध्ये वादी हा dominus litis असतो. त्यामुळे कोणत्या प्रतिवादीविरुध्द दावा चालवायचा हा सर्वस्वी वादीचा निर्णय असतो. दाव्याच्या मागणीचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. ८ च्या अपरोक्ष देखील सदरचा दावा गुणवत्तेवर चालु शकतो. निश्चीतच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये न्यायालय दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जावर किंवा अर्जाशिवाय एखादा पक्षकार काढून टाकू शकते किंवा त्यांना पक्षकार म्हणून सामील करु शकते. मात्र प्रस्तावीत पक्षकारांना काढून टाकल्यास किंवा सामील केल्यास त्या संदर्भात नि. १ येथे दावा दुरुस्ती करावीच लागेल. त्यामुळे सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० तसेच आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल झालेला आहे. सदरची दावा दुरुस्ती केल्यास इतर प्रतिवादीचे कोणतेही विशेष नुकसान होणार नाही. मात्र वादीला नुकसान होवू शकते. सबब सदरची दावा दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## - आदेश -

| | |
|---|---|
| १. | अर्ज निशाणी ७१ मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादीला प्रतिवादी क्र. ८ यांच्या नावासमोर काट मारण्यास व त्यांच्या विनंती कलमामध्ये प्रस्तावीत दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते. |
| ३. | वादीनी प्रतिवादी क्र. १ ला झालेल्या विलंबाबाबत रक्कम रुपये ५००/- इतकी खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर हा अर्ज मंजूर होतो. |
| ४. | सदरची दावा दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत त्वरीत अभिलेखावर |

| | |
|---|---|
| | दाखल करावी व त्याची प्रत विरुध्द पक्षास देणे. |

सही/-

**स्थळ - देवरुख** **(श्रुती ह. पाटील )**
**दि. ११/०१/२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,देवरुख**

# -: **C E R T I F I C A T E** :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 33/2022 Exh 62 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade (Jr. clerk) |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 26/09/2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 26/09/2023 |
| Order uploaded on | : | 26/09/2023 |